**रे.दि.मू.नं. १७४/२०१३ मधील नि. १०० खालील आदेश**
**( शंकर राउत विरूध्द प्रकाश कांबळे )**
**(आदेश पारीत दि. १८/०६/२०१९)**

नि. १०० वरील प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचे विरूध्द झालेला उलटतपास नाही (No cross) चा आदेश रद्द होवून मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जास वादीने म्हणणे दाखल केले आहे.

२. अर्ज, म्हणणे याचे अवलोकन केले. सदरील दावा हा वादीने निरंतर ताकीद मिळणेकरिता दाखल केला आहे. सदर दाव्यामध्ये वादी यांचा पुरावा पूर्वीच संपलेला असून तशी पुरशीस देखील अभिलेखावर दाखल आहे. वादीचे वकीलांनी सदरचा अर्ज कॉस्टवर मंजूर करणेस हरकत नसल्याचे कथन केले. प्रतिवादींचे नि. १०० मध्ये नमूद केलेली कारणे व त्यास वादीने दिलेले म्हणणे विचारात घेता वादी व प्रतिवादी यांचेमधील अंतिम वाद निकाली काढणेकरिता प्रतिवादी विरूध्द झालेला उलटतपास नाही (No cross) चा आदेश रद्द करणे व त्यांना उलटतपास घेणेस संधी देणे न्यायोचित वाटते. सबब मी खालील आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. नि. १०० चा अर्ज मंजूर करणेत येतो.

२. प्रतिवादीविरूध्द झालेला उलटतपास नाही (No cross) चा आदेश रक्कम रूपये ४०००/— चे कॉस्टवर रद्द करणेत येतो.

३. प्रतिवादी यांनी वर नमूद कॉस्टपैकी रक्कम रूपये ३०००/— वादी यांना द्यावी व उर्वरित रक्कम रूपये १०००/— ही विधी सेवा प्राधिकारण, खंडाळा येथे जमा करावी.

४. सदर आदेशाची दोन्ही पक्षकारांनी नोंद घ्यावी.

**दि. १८/०६/२०१९**

**( अ.ब.चव्हाण )**
**सह.दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**खंडाळा.**